भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ अन्वये
संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख

**श्री. वाय. पी. बावकर, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दोडामार्ग यांचे न्यायालयात.**

CNR No. MHSI100002942025
संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १८२/२०२५
निशाणी क्र. ०३

| | |
|---|---|
| १) गुन्हा घडल्याची तारीख | : १८/१२/२०२५ |
| २) फिर्याद दाखल केल्याची तारीख | : १८/१२/२०२५ |
| ३) फिर्यादी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील | : अभिजीत शिवाजी कांबळे, पो.कॉ.१२९१ दोडामार्ग पोलीस ठाणे. |
| ४) आरोपी यांचे नाव, वय, पत्ता इत्यादीचा तपशील | : गोपाळ रामा नायडु, वय ६७ वर्षे, रा.शांतीनगर, पिसुर्लेम, सत्तरी, गोवा. |

५) दोषारोप पत्रातील गुन्ह्याचा तपशील जो आरोपीस वाचून स्पष्ट करुन सांगण्यात आला तो खालीलप्रमाणे –

दिनांक १८/१२/२०२५ रोजी रात्री १८:१५ वा.चे दरम्याने मौजे दोडामार्ग येथील दोडामार्ग ते गोवा जाणाऱ्या रोडवर तुम्ही तुमच्या ताब्यातील निळया रंगाचा चारचाकी टेम्पो क्र. जी.ए.०४–टी–७१५६ हे वाहन सार्वजनीक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा धोकादायक प्रकारे उभे करुन ठेवल्याचे आढळून आले आणि म्हणुन तुम्ही भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २८५ प्रमाणे गुन्हा केल्याचे तोहमत आहे व सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात आहे.

६) आरोपीचे प्रतिकथन :–

प्रश्न १ : पोलीसांनी केलेल्या तपासकामातील कागदपत्राच्या प्रती मिळाल्या काय ?

उत्तर : होय

प्रश्न २ : दोषारोपपत्रातील गुन्हयाचा तपशील जो आता तुम्हांस वाचून व स्पष्ट करुन सांगण्यात आला तो तुम्हांस समजला का ?

उत्तर : होय

प्रश्न ३ : सदरचा गुन्हा तुम्हांस कबुल आहे का ?

उत्तर : होय

समक्ष

सही/-

.....................................

आरोपीची सही

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.03.14 15:34:40 +0530

(वाय.पी.बावकर)

दिनांक :- १४.०३.२०२६ न्यायदंडाधिकारी वर्ग -१, दोडामार्ग.

**-:: आदेश ::-**

(जाहीर दिनांक १४.०३.२०२६)

आरोपी न्यायालयासमोर हजर केले असता त्याने सदरचा गुन्हा कबुल असल्याचे सांगितले. तसेच गुन्हा कबुल करताना त्याच्याविरुद्ध कुठल्याही प्रकारचा दबाव किंवा प्रलोभन नसल्याचेही सांगितले. म्हणुन आरोपीला त्याच्या विरुद्ध ठेवण्यात आलेल्या आरोपाचा सारांश वाचून समजावून सांगितला असता त्याने गुन्हा कबुल आहे असे पुन्हा सांगितले. त्यामुळे आरोपीची कबुली स्वखूषीने आहे असे दिसून येते.

आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता त्याने अनावधानाने सदर गुन्हा घडल्याचे व त्याची परिस्थिती गरीबीची आहे व त्याचेवर त्याचे कुटुंब अवलंबून आहे असे सांगितले, त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. आरोपीची आर्थिक परिस्थिती व वय लक्षात घेता त्याला दंडाची शिक्षा योग्य होईल म्हणुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**-:: आदेश ::-**

१. आरोपी गोपाळ रामा नायडु, वय ६७ वर्षे, रा.शांतीनगर, पिसुर्लेम, सत्तरी, गोवा याला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ खालील गुन्ह्यासाठी दोषी धरण्यात येते.

२. आरोपी याला भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २८५ अन्वये केलेल्या अपराधाबाबत रक्कम रुपये २००/- (रुपये दोनशे मात्र) चा द्रव्यदंड, दंड न भरल्यास २ दिवस साधी कैद याप्रमाणे शिक्षा देण्यात येत आहे.

३. आरोपीला इतर गुन्हयात आवश्यकता नसल्यास सोडून देण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते
Digitally signed by YASHODHAN PRADEEP BAVKAR
Date: 2026.03.14 15:35:48 +0530

ठिकाण :- दोडामार्ग. (वाय. पी. बावकर)

दिनांक :- १४.०३.२०२६. न्यायदंडाधिकारी वर्ग -१, दोडामार्ग.